# हिंदुराष्ट्रदर्शन

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**हिंदुराष्ट्रदर्शन : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# हिंदुराष्ट्रदर्शन

# अखिल हिंदु–विजय– ध्वज

अखिल– हिंदु– विजय– ध्वज हा । उभवु या पुन्हा ।।
ध्वज हा । लढवु या पुन्हा ।।धृ०।।
ह्या ध्वजासची त्या काली । रोविती पराक्रमशाली
रामचंद्र लंकेवरती, वधुनि रावणा ।।१।।
करित जैं सिकंदर स्वारी । चंद्रगुप्त ग्रीकां मारी ।
हिंदुकूश शिखरी चढला, जिंकुनि रणा ।।२।।
रक्षणी ध्वजाच्या ह्याची । शालिवाहनाने साची ।
उडविली शकांची शकले समरि त्या क्षणा ।।३।।
हाणिंले हुसकितां जेथे । हूणांसि विक्रमादित्ये ।
हाचि घुमवि मंदोसरच्या त्या रणांगणा ।।४।।
जई–जईं हिंदुसम्राटे । अश्वमेध केले मोठे ।
करित पुढचि हाची गेला विजयघोषणा ।।५।।
उगवुनी सूड हिंदूंचा । मद मर्दुनि मुस्लीमांचा ।
शिवराय रायगडिं करिती वीरपूजना ।।६।।
ध्वज हाचि धरुनि दिल्लीला । वीरबाहु भाऊ गेला ।
मुसलमीन तख्ता फोडी हाणुनी घणा ।।७।।
पुढति नेम काही ढळला । ध्वज जरी करांतुनि गळला ।
उचलु या पुनरपि प्राणां लावुनि पणा ।।८।।

कवि : **स्वातंत्र्यवीर सावरकर**

# हिंदु तरुणा ! ऊठ, झुंज !!

निज-जाति छळाने हृदय का न तळमळते?
तुम्हि तरुण, शिरांतुनि रक्त नवे सळसळते
    हे नवे रक्त तो विजेहुनी पेटावे
    मृत्युशी तुम्ही गाठून बळे भेटावे
मग मुकुट आपुला कोणी । फोडिला?
हिंदूंचा झेंडा कोणी । तोडिला?
आशेचा अंकुर कोणी । मोडिला?
हे चिंतुनि चिंतुनि क्रुद्ध आसवे जळती
दिन-रात्री डोळ्यांतूनि का न रे गळती?
या भारतभूस्तव समररंगणी गेले
या चिंतेने बहु वीर लढुनिया मेले
    कुणि घोर यातनांचिया चितेविर जळले
    कुणि फांस गळ्याशी लागतांहि ना ढळले
त्या त्यांच्या अपुऱ्या इच्छा । या क्षणी
तुम्हांसि बाहती हांका । फोडुनी
कां ऐकू येती कोणा । यांतुनी
जरि येति तरी ते ऊठ कोण जो तो तू
घे करी शिरा, जा झुंज पुरव तो हेतू.

कवि : **स्वातंत्र्यवीर सावरकर**

## अध्यक्षीय भाषणांचा अनुक्रम


- कर्णावती १९३७ .............................. ११
- नागपूर १९३८ .............................. ४२
- कलकत्ता १९३९ .............................. ९१
- मदुरा १९४० .............................. १३६
- भागलपूर १९४१ .............................. १९०
- कानपूर १९४२ .............................. २१३
- अमृतसर १९४३ .............................. २५०
(अध्यक्षीय त्यागपत्राविषयीची वक्तव्ये)

### अ. भा. हिंदुमहासभा : १९ वे अधिवेशन

# कर्णावती

### १९३७

हिंदु महासभा ही काही प्रामुख्याने 'हिंदु धर्मसभा' नाही तर ती प्राधान्येकरून सामाजिक, राजकीय नि सांस्कृतिक अशा सर्वच अंगांनी हिंदुराष्ट्राच्या भवितव्याला आकार देणारी – 'हिंदु राष्ट्रसभा'च, एक अखिल हिंदु संघटनाच – असल्याची युगप्रवर्तक घोषणा कर्णावतीच्या अध्यक्षीय भाषणात करून वीर सावरकारांनी एका नव्या राजकीय कालखंडाला जन्म दिला. स्वत्वाचा विसर पाडणारा नि हिंदुहितावरच तेवढा नेमका निखारा ठेवणारा, काँग्रेसने आजपर्यंत प्रचारिलेला 'हिंदी राष्ट्रवाद' स्वातंत्र्यवीरांच्या या पहिल्याच घोषणेने कोलमडून पडला आणि मोहनिद्रेतून जागृत झालेला विराट हिंदु राष्ट्रपुरुष पुन्हा आपले उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी बद्धपरिकर होऊन उठला.

**अध्यक्षीय भाषण**

**सभ्य स्त्री–पुरुष हो!**

अखिल भारतीय 'हिंदु महासभे'च्या १९ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावर माझी निवड नि नेमणूक करून आपण मजवर जो विशेष विश्वास टाकला आहे त्याकरिता प्रथमच मी आपले अत्यंत मनापासून आभार मानतो. माझ्या गतकालातील सेवेच्या सन्मानार्थ म्हणून हे स्थान माझ्या राष्ट्राने मला समर्पिले आहे असे तितकेसे न मानता माझ्या अंगी अद्यापीही उर्वरित असलेली सर्व शक्ती अखिल